पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०५/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **११/०५/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२) मा. गोफणे अनुराधा देविदास
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. लांडे श्रध्दा बाजीराव
५) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) २१ जून हा दिवस जागतिक योग दिन म्हणून साजरा करणेबाबत – मा.श्रध्दा लांडे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२७/०४/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १४ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : १६ विषय क्रमांक : १

दिनांक : ११/०५/२०१६

सुचक : मा.श्रध्दा लांडे अनुमोदक : मा.वैशाली जवळकर

संदर्भ :- मा.श्रध्दा लांडे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना व उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये २१ जून हा जागतिक योग दिन साजरा करणे हा उपक्रम राबविण्यात येतो. तरी या वर्षी २१ जून २०१६ रोजी या जागतिक योग दिनाच्या दिवशी महिलांसाठी योगासन प्रात्यक्षिके, योगासन या विषयावर व्याख्याने व उपस्थित महिलांना अल्पोपहार देणे असा उपक्रम राबविण्यास व त्याकामी येणा-या र.रु.७५,०००/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२७३/२०१६
दिनांक : ११/०५/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.